## (९) : उत्तर प्रदेश :

जैन धर्मियांसाठी उत्तर प्रदेशात अनेक वंदनीय स्थळे आहेत. कृषी मशी अशा मानवाला भ. वृषभदेवानी मंत्र दिला. प्राचीन काळी गंगा, यमुना, गोमती नदी काठी अनेक जैन संस्कृती नांदत होत्या. चंदेल, वाकाटक कच्छप आर्य कुषाण आदि शूर वंशाचे राजे यांनी जैन धर्माला आश्रय दिला होता.

जैन कलेसाठी उत्तर प्रदेश समृध्द आहे. देवगड, श्रावस्ती, मथुरा, काकंदी, आयोध्या इ. सनापूर्वीपासूनच्या जिन मूर्त्या उपलब्ध आहेत.शाश्वततीर्थ आयोध्या क्षेत्र सर्व तीर्थंकरांची जन्म भूमी असते. उत्तर प्रदेशामध्ये अनेक सिध्दक्षेत्रे कल्याणक क्षेत्रे आणि अतिशय क्षेत्रे आहेत.

वर्तमान दिल्लीमध्ये एकूण १३४ जिनमंदिरे असून अधुनिक कुंद कुंद शोध संस्था आचार्य विद्यानंदी महाराजांचे योगदान अतुलनीय आहे. प्रदेशात अनेक ऐतिहासिक औद्योगिक आणि थंड हवेची ठिकाण उपलब्ध आहेत. येथील समाज सधन असून धर्म प्रेमी आहे.

### अतिशयक्षेत्र - ललितपूर

मार्ग: मध्य रेल्वे बंगलोर दिल्ली कर्नाटक एक्सप्रेसने सोलापूरहून ललितपूर स्टेशनला जाता येते.

उत्तर प्रदेश मधील दक्षिणेकडील शेवटचा जिल्हा असून या ठिकाणावरून अनेक जैन क्षेत्रांना जाता येते. या ठिकाणी अत्यंत भव्य अशी प्राचीन मंदिरे आहेत. प्रमुख मंदिर स्टेशनरोडवरील क्षेत्रपाल बाबा का मंदिर नावाने प्रसिध्द असलेले अतिशय भव्य मूलनायक भ. अभिनंदननाथाची मूर्ती आहे एका विशाल सभागृहामध्ये भ. शांतीनाथ, कुंथुनाथ, अरंहनाथ यांच्या भव्य खडगासन मूर्त्या आहेत.

सुविधा: अतिशय क्षेत्र क्षेत्रपाल मंदिरात धर्मशाळा आहेत.

## अतिशयक्षेत्र - पवाजी

मार्ग: ललितपूर पासून ४५ कि.मी. आणि झांसीपासून ४० कि.मी. राज्य रस्त्यावर कडेसरा गावापासून ३ कि.मी. आत हे क्षेत्र आहे. पावा पहाडावर स्वर्णभद्र मूनीचे चरण चिन्ह आहेत. १० मिटर उंचीचे मानस्तंभ असून भ. बाहुबलीची भव्य मूर्ती आहे. पायथ्याशी एक जिन मंदिर असून त्यात मुलनायक भ. पार्श्वनाथांची सातिशय मूर्ती आहे. याला अजैन लोक भुरेबाबा म्हणून ओळखतात. आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी भक्तीभावाने पूजा करतात.

सुविधा: या ठिकाणी धर्मशाळा आहेत.

## अलाहाबाद

मार्ग: मुंबई मार्गे हावडा व इतर देशाच्या चोहोकडून रेल्वेने व सडकमार्गे जाता येते. येथे विमान तळाची सोय आहे.

अलाहाबाद हे भारतीय संस्कृतीचे व अध्यात्म संस्कृतीचे केंद्र आहे. तिर्थराज प्रयाग संगम अलाहाबाद जवळ गंगा - यमुना सरस्वतीचे पावन संगम असून हिंदुचे परमतीर्थ आहे. या ठिकाणी ४ जिनमंदिर असून अत्यंत भव्य आणि विशाल आहेत.

प्रेक्षणीय स्थळ: विश्वविद्यालय, पंडीत नेहरू  यांचे जन्म स्थान, आनंदभवन,

सुविधा:  चाहचंद मोहल्यात जैन धर्मशाळा आहे.

## कल्याणक्षेत्र- वाराणसी (काशी)

मार्ग:  सोलापूराहून वाराणशीस दौंड मार्गे पुणे-  वाराणासी रेल्वेने ७ वे तिर्थंकर सुपार्श्वनाथ आणि २३ वे तीर्थंकर पार्श्वनाथ यांचे स्थान आहे.

जैनांचे ७ वे तीर्थंकर पार्श्वनाथ यांचे ४ कल्याणकेया ठिकाणी झाले. बाबु छेदातील घाट येथे दि. जैन मंदिर असून भेलपूरा मोहल्यात भ. पार्श्वनाथांचे जन्मभूमी मंदिर आहे. गंगा किनारी भदैनी घाट येथे स्यादवाद महाविद्यालय आहे.

प्रेक्षणीय स्थळ :  काशी विश्वनाथ मंदिर, राजा हरिश्चंद्र घाट अनेक पवित्र घाट, बनारस विश्व विद्यालय पाहण्यासारखे आहेत.

सुविधा: भेलपूरा आणि मैदागनी येथे सर्व सुविधानी युक्त धर्मशाळा आहेत.

## कल्याणकक्षेत्र- सिंहपुरी (सारनाथ)

मार्ग:  वाराणसी पासून केवळ ८ कि.मी. दूर हे क्षेत्र आहे. बौध्द व जैन सांप्रदायाचे पवित्र क्षेत्र आहे. जैनांचे ११ वे तीर्थंकर श्रेयांसनाथ यांची ही जन्मभूमी आहे या ठिकाणी भव्य जिनालय असून मूलनायक भगवान श्रेयांसनाथाची मूर्ती आहे. मंदिराच्या समोर २२०० वर्ष प्राचीन ३०० फुट उंच विशाल आणि कलापूर्ण स्तुप आहे. यालाच सारनाथ स्तुप असे म्हणतात. या ठिकाणी एक मोठे पुराण वस्तु संग्रहालय असून चार सिंहावर धर्मचक्रअंकित असून ही कलाकृती भारतीय गणतंत्राचे राजचिन्ह म्हणून घेतलेले आहे. या ठिकाणी गौतम बुध्दाचे भव्य असे मंदिर असून गौतम बुध्दाने प्रथम आपल्या शिष्याला उपदेश केला असे मानतात.

अनेक विदेशी पर्यटक सतत दर्शनास येत असतात.

सुविधा: दि. जैन मंदिर समोर सर्व सुविधांनी युक्त धर्मशाळा आहे.

## कल्याणकक्षेत्र- चंद्रपुरी

मार्ग: वाराणसी पासून २० कि.मी सिंहपुरी पासून १५ कि.मी.सडक मार्गावर हे स्थान आहे.

गंगा किनारी हे छोटेसे गाव वसले असून भ.चंद्रप्रभूची जन्मभूमी मानली जाते. गंगा किनारी दि. जैन मंदिर असून चंद्रप्रभूची प्रतिमा विराजमान आहे. श्वेतांबर जैनांचे या ठिकाणीमंदिरे आहेत.

## कल्याणकक्षेत्र- काकंदी

मार्ग: देवरिया सलेमपूर सडक मार्गावर २ कि.मी. दूर हे क्षेत्र आहे. वर्तमान या गावाचे नाव खुरकुद आहे. या ठिकाणी दि. जैन मंदिर असून पुष्पदंताची श्वेत वर्णीय प्रतिमा आणि नेमिनाथाची भव्य प्रतिमा आहेत. भ.महावीरांचे समशरण झाल्याचा उल्लेख आढळतो. या ठिकाणी भू- गर्भातून अनेक जैन मूर्ती उपलब्ध झालेल्या आहेत.

सुविधा: धर्म शाळा आहेत.

## कल्याणकक्षेत्र- अयोध्या

मार्ग: दिल्ली बनारस हावडा रेल्वे मार्गातील प्रमुख स्टेशन असून आलाहाबादवरून ६० कि.मी. व फ़ैजाबादवरून हे क्षेत्र जवळ आहे. विश्व प्रसिध्द आयोध्या जैन धर्मानुसार स्वस्तिक चिन्ह स्थापित अनंतानंत २४ तिर्थंकराची जन्मभूमी असून शाश्वत तीर्थ आहे. वर्तमान हुंडावसर्पणी कालामुळे या ठिकाणी भ. आदीनाथाचे पुरातन मंदिर असून वर्तमान काळी कटरा भ. आदीनाथांची ३७ फुट उंच भव्य अशी खडगासन प्रतिमा अत्यंत दर्शनीय असल्याने समस्त भारत वर्षातून हिंदु अत्यंत नम्रतेने दर्शनास येत असतात.त्याच प्रमाणे गुरू गोविंद गुरू द्वारा,तुलशी मानस मंदिर,हनुमान गडी,कणकभवन इ .अनेक दर्शनी स्थळे आहेत.

सुविधा:  कटरा व रायगंज येथिल धर्मशाळा सुविधा युक्त आहेत.

## कानपूर

मार्ग : महत्वाच्या सर्व रेलगाड्या कानपूर मार्गे जातात. महत्वाचे औद्योगिक क्षेत्र असून गंगा किनारी हे शहर वसले आहे. या ठिकाणी अनेक जिन मंदिर असून दर्शनीय आहेत. सुविधा लाढी मोहल्ला जैन धर्मशाळा आहेत.

## लखनौ

मार्ग:  महत्वाच्या सर्व सडक आणि रेल्वे मार्गे लखनौला जाता येते. उत्तर प्रदेशाची राजधानी, राजकीय आणि ऐतिहासिक प्रसिध्द शहर असून अनेक जैन मंदिर आहेत. ६ जैन मंदिर आहेत. चौक, डाली गंज, यादिया गंज, मधील मंदिर प्रसिध्द आहेत.

प्रेक्षणीय स्थळे :  लहान बाडा, इमाम बाडा, प्राणीसंग्रहालय प्रसिध्द आहेत.

सुविधा: चारबाग स्टेशन जवळ मुन्नेलाल धर्मशाळा आणि जिनमंदिर आहे.

## अतिशयक्षेत्र- फ़िरोजाबाद

मार्ग:  आगराहून सडकमार्गे ४५ कि.मी. अंतर बांगडी बनविण्याचे कारखाने आहेत.  जैन वस्ती मोठी आहे. या ठिकाणी २१ जिन मंदिरे आहेत. पैकी छदामीलाल यांचे नव निर्मित मंदिर विशाल कलापूर्ण असून महावीरांची ६ फुट उंच प्रतिमा दर्शनीय आहे. मंदिराच्या बाजूने औषधालय, पुस्तकालय, विद्यालय आहेत. पंचायती मंदिर मध्ये मौल्यवान अशा हिरा स्फ़टीक आदि मूर्ती अतिसुंदर आहेत.

सुविधा: धर्मशाळा आहेत.

## आग्रा

मार्ग: सोलापूरहून बेंगलोर दिल्ली कर्नाट्क एक्सप्रेसने आग्रा येथे जाता येते. १००० कि.मी. अंतर आहे. विश्वविख्यात आग्रा ताजमहालसाठी प्रसिध्द असून त्या ठिकाणी अनेक ऐतिहासिक भव्य वास्तु आहेत. जैनधर्मीय लोकांची संख्या ही मोठी आहे. एकूण ३४ जिनमंदिर असून ताजमहाल जवळील ताजगंज पार्श्वनाथ मंदिर.रोशन मोहल्ला मधील शितलनाथ मंदिर, मोतीकरण मधील पंचायत मंदिर प्रसिध्द आहेत. जैन साहित्यकार बनारसीदास, कवीवर मुधरदास यांचे जैन साहित्य याच ठिकाणी निर्माण झाले.

प्रेक्षणीय स्थळे: जगप्रसिध्द ताजमहाल (शुक्रवारी मोफ़त प्रवेश असतो)आग्रापासून २० कि.मी. वर असलेले मोगलांची जूनी राजधानी फ़त्तेपूर सिक्री सिंकंदरा, दयालबाग, आदी प्रेक्षणीय स्थळे असून देशी विदेशी लोक भेट देण्यासाठी सतत येत असतात.

सुविधा: या ठिकाणी दोन जैन धर्मशाळा असून (१) मोती कटरा (२) बेलनगंज येथे सर्व सोयींनी युक्त धर्मशाळा आहे.

## सिध्दक्षेत्र - मथुरा

मथुरा पुरी उद्यान,जम्बू स्वामी गयो निर्वाण।

चरम केवली पंचम काल,तिनके चरण नमूं तिहू काल।।

मार्ग: सोलापूरहून बेंगलोर दिल्ली कर्नाटक रेल्वेने आग्राला उतरून मथुरा ८० कि.मी. सडक मार्ग दूर आहे. ( कर्नाटक एक्सप्रेस मथुरा येथे थांबत नाही) प्राचीन काळापासून मथुरा हे हिंदु बौध्द आणि जैन धर्मांचे पावन तीर्थ आहे.

जैन चौरासी: जैन धर्माचे अंतीम केवली जंबू स्वामी हे येथून मोक्षास गेले, जैन चौरासी येथे १ दिगंबर जैन मंदिर असून दुसरे मंदिर काचेचे अति मनोहर असे आहे. मंदिराच्या बाहेर सुंदर बगीचा आणि धर्मशाळा आहे.

प्रेक्षणीय स्थळे: श्रीकृष्ण जन्मस्थळ, द्वारकाधीश मंदिर,वृंदावनातील रंगजी मंदिर बाके विहारी मंदिर,गोवर्धन आदी दर्शनीय स्थळ आहेत.

सुविधा: घियामंडी आणि जैन चौरासियामध्ये सर्व सोयींनी युक्त धर्मशाळा आणि भोजनालय आहेत.

## क्षेत्र- दिल्ली

मार्ग: सोलापूरहून बेंगलोर न्यू दिल्ली कर्नाटक एक्सप्रेसने जाता येते. भारताची राजधानी असून सडक,रेल्वे, विमान मार्गे या ठिकाणी जाता येते. दिल्लीला पूर्वी इंद्रप्रस्थ म्हणत असत. ४०० वर्षा पासून दिल्लीमध्ये अनेक दिंगंबर जैन मंदिर असून जैन समाज मोठा आहे. एकूण १२५ जिन मंदिर असून खालील जिन मंदिर प्रेक्षणीय आहेत.

(१) लाल मंदिर, चांदनी चौक, हे मंदिर लाल किल्ल्यासमोर असून अत्यंत भव्य आहे. मूलनायक भगवान पार्श्वनाथांची प्रतिमा आणि पद्मावती देवीची सातीशय मूर्ती मंदिरात आहे. असंख्य भक्तगण दररोज तूपाची आरती भक्तीभावाने करीत असतात.

(२) नया मंदिर धर्मपुरा

(३) बडा मंदिर

(४) पार्श्वनाथ मंदिर सब्जी मंडई

(५) दर्यागंज मंदिर

(६) कुंदकुंद भारती महरोली (कुतुब)

(७) अहिंसा स्थल या ठिकाणाचे मंदिर अत्यंत भव्य व दर्शनीय आहेत.

प्रेक्षणीय स्थळे : राष्ट्रपती भवन, इंडिया गेट, कुतुबमिनार, जामा मशीद, राज घाट, शांती वन, लोटस टेंपल, लाल किल्ला.

सुविधा: चांदनी चौक लाल मंदिर उदासीन धर्मशाळा. दर्यागंज कोतवाली जवळील धर्मशाळा, सायकल मार्केट जवळील धर्मशाळा सर्व सोयींनीयुक्त असून सायकल मार्केट जवळील धर्मशाळेत भोजनाची उत्तम सोय आहे.

## मेरठ

मार्ग: दिल्ली मार्गे मेरठ ९० कि.मी. असून रेल्वेने व सडक मार्गे जाता येते. आंतरराष्ट्रीय बस अड्ड्यापासून मेरठची सोय आहे. मेरठ हे उत्तर प्रदेशातील एक मोठे शहर असून औद्योगिक व राजकीय क्षेत्रात प्रसिध्द आहे. ब्रिटिशांच्या काळी या शहराचे अन्यन साधारण महत्व होते. या ठिकाणी दोन जिन मंदिर असून भव्य व दर्शनीय आहेत.

सुविधा: धर्मशाळा आहेत.

## कल्याणकक्षेत्र- हस्तिनापूर

मार्ग: दिल्ली मार्गे मेरठ पासून ३७ कि.मी. अंतरावर हे क्षेत्र आहे. हस्तिनापूर ही नगरी अत्यंत प्राचीन असून प्रथम तिर्थंकर भ. वृषभदेव यांना या नगरीचा राजा श्रेयांश याने इक्षुरसाचा प्रथम आहार दिला. अनेक तिर्थंकरांचे समवशरण झालेले आहेत. भगवान शांतीनाथ, कुथुंनाथ,

अरहनाथ या तीन तिर्थंकरांचे ४ कल्याणक येथे झालेले आहेत. ही कौरव पांडवाची राजधानी होती. इ.स. १८०१ मध्ये या ठिकाणी भव्य दिंगबर जैन मंदिर बांधण्यात आले. भगवान शांतीनाथ, कुथूंनाथ आणि अरहनाथ यांचे चरणचिन्ह उपलब्ध आहेत. मंदिराच्या भोवताली  भगवान पार्श्वनाथांची भव्य मूर्ती , नंदेश्वर मंदिर, समवशरण रचना, भगवान बाहुबलीची कलात्मक मूर्ती असून गुरू कुल आहे. आर्थिका रत्न ज्ञानमतीजी माताजी यांच्या प्रेरणेने जुन्या मंदिर पासून एक परलांग अंतरावर जैन त्रिलोक संस्था एका विशाल रचना केलेली आहे. बाहुबली मंदिर जलमंदिर, कलामंदिर, आदी रचना आहे. जंबूदीप ८४ फ़द्नट उंच असून टोकापर्यंत पाय-यावरून जाता येते.

जम्बुद्वीप रचना:    सुमेरू पर्वत म्हणून ८४ फूट उंच भोवताली लवण समुद्र बागबगीचे बनविले असून कृत्रिम अशा लवण समुद्रातून नौका विहार करता येते. जुने मंदिराचे प्रवेशद्वार अत्यंत भव्य असून दर्शनीय आहे.

सुविधा:  दोन्ही मंदिरात आधुनिक सर्व सुविधायुक्त धर्मशाळा असून नि:शुल्क भोजन व्यवस्था  आहे.  श्वेतांबर जैन समुदायाचे मंदिर धर्मशाळाही भव्य आहेत.

## अतिशय क्षेत्र    हरिद्वार

मार्ग:   दिल्ली ते हरिद्वार प्रत्येक १ तासाला लक्झरी बसेस आहेत. या सर्व बसेस अंतर राज्य बस अड्डा या ठिकाणावरू न निघतात. दिल्ली हरिद्वार ६ तासाचा प्रवास आहे. पावन- गंगा, हरिद्वार येथे सपाट प्रदेशात येते हरिद्वार किंवा हरद्वार म्हणून हिंदुना अत्यंत पवित्र असे स्थान असून निसर्ग सौंदर्य अनेक मंदिर धर्मशाळा , गंगा घाटानी सुशोभित आहेत. समुद्र सपाटी पासून उंची १०२९ फूट असून देशी परदेशी पर्यटक नेहमीच दर्शनाला येत असतात. मिडटाऊन हॉटेलच्या बाजूस दि. जैन मंदिर असून भगवान आदीनाथाची मूर्ती आहे.

सुविधा:  अनेक सुविधायुक्त धर्मशाळा असून दि. जैन धर्मशाळा आहे.

## ऋषीकेश

मार्ग:  हरिद्वार पासून ३० कि.मी. ऋषीकेश येथे अनेक हिंदुची मंदिरे असून जैन मंदिर ही आहेत. गंगा किनारी अनेक घाट असून त्या ठिकाणी भक्त जन हजारोंच्या संख्याने येत असतात. नेहमी कुंभमेळा, हरिद्वार, ऋषीकेशला भरतो. उतारावरून शहरांची रचना आहे. लक्ष्मणझुला, अप्रतिम असून त्यावरून चालणे हे साहस वाटते.

सुविधा: धर्मशाळा आहेत.

## अतिशयक्षेत्र  श्रीनगर (गडवाल)

मार्ग: ऋषीकेश पासून १०० कि.मी. अंतर पौंडी गडवाल विभागातील श्रीनगर मोठे शहर अलकनंदा नदी किनारी वसले आहे. नदीकाठी दिंगबर जैन मंदिर असून भगवान पार्श्वनाथाची सातिशय मूर्ती आहे. भगवान पार्श्वनाथाची चमत्कारयुक्त प्रतिमा असल्याने सतत दर्शनाला येत असतात. मंदिरात क्षेत्रपाल आहे.

सुविधा:  अनेक धर्मशाळा आहेत.

## जोशीमठ

मार्ग:  बद्रीनाथ किंवा केद्रारनाथ जाणेसाठी प्रवाशांना हरिद्वार ऋषीकेश मार्गे जोशीमठास यावे लागते. श्रीनगर वरू न १४० कि.मी. सडक मार्गे अंतर आहे. बद्रीनाथ किंवा केद्रारनाथ हे महाद्वार म्हणतात.

## सिध्दक्षेत्र - अष्टापद( बद्रीनाथ)

मार्ग: सोलापूरहून बेंगलोर दिल्ली कर्नाटक एक्सप्रेसने दिल्लीला जाता येते. दिल्लीवरून अंतर राज्य बस अड्डा येथून हरिद्वारला सतत बसेस आहेत. हरिद्वार येथे चांगल्या टॅक्सी भाड्याने मिळतात. किंवा गडवाल निगमच्या मंडळाच्या सरकारी मिनी बसेस मिळतात. अंदाजे खर्च १५०० रू . प्रत्येकी होतो. जी.एम.व्ही, एन. मुनीकरिता ऋषीकेश यांचेशी पत्रव्यवहार करता ये्तो. आगाऊ आरक्षण करता येते. स्व:ताच्या वाहनाने आपण पुढील प्रवास करू  शकत नाही. आपणास स्वतंत्र वाहनाने जाणेचे असल्यास खालील पत्त्यावर पत्र व्यवहार करावा. श्रीनगर पौडी गडवाल टुरिस्ट होम. श्रीनगर किंवा कालीकमलेवाले धर्मशाळा श्रीनगर किंवा विवेक टुरिस्ट लॉज, अप्पर बझार. जोशी मठ.हरिद्वार ते बद्रीनाथ प्रवास २ ठिकाणी मुक्काम करू  शकतो.

पहिला मुक्काम श्रीनगर गडवाल दुसरा मुक्काम जोशीमठला येथेही जैन धर्मशाळा आहेत. व्यवस्था अपूरी आहे. सकाळी ६।। चे आत जोशी मठ गेट सोडल्यास ९ वाजेपर्यंत बद्रीनाथला पोहचतो. भोजन करून परत २ वाजता जोशी मठाकडे येता येते. जोशी मठात मुक्काम करावा. एका दिवसात आरामात प्रवास होतो. बद्रीनाथ येथे भ.१००८ आदिनाथ निर्वाण स्थळी बोर्ड आपणास बद्रीनाथ चेक पोस्ट जवळच डाव्या बाजूला रोडवर दिसतो. अष्ठापद म्हणजे हिमालयातील गौरीशंकर ,कैलास, बद्रीविशाल, नंदा, द्रोणागिरी, नर, नारायण आणि त्रिशुली अशा आठ पर्वतराजीमुळे अष्ठपाद आदिश्वर स्वामी असे म्हटले आहे. तेथूनच भगवान आदिनाथ स्वामींना मोक्ष प्राप्त झाला.  बद्रीनाथ समुद्रसपाटीपासून १२५०० फूट उंच आहे. अलकनंदा नदीच्या किना-यावर आहे. गावाच्या मध्यभागी बद्री विशाल मंदिर आहे. मंदिरास अलकनंदेच्या पूलावरून जावे लागते. पूलाच्या उजव्या बाजूने पायवाट जाते. नदीच्या किना-याने १ कि.मी. अंतरावर अष्ठापद आदिनाथाच्या चरणपादुका आहेत. धर्मशाळा व जैन मंदिर आहे. जेवण्याची व राहण्याची उत्तम सोय आहे. श्री बाबुलाल जैन हे तेथील मॅनेजर आहेत. येथील सर्वात दर्शनीय पर्वत निलकंठ २१४६० फूट उंच अत्यंत मनोहर दिसते. बद्रीनाथ मंदिराजवळ गरम पाण्याचे झरे आहेत. त्यात आंघोळ करता येते.

सुविधा: अनेक सोयीनीयुक्त धर्मशाळा व भोजनालय आहेत. प्रवास मे ते सप्टेंबर पर्यंत करावा नंतर हे संपूर्ण क्षेत्र बर्फ़ाने आच्छादिले जाते. प्रवास नियोजित करूनच करावा.

अष्ठापद कैलास बद्रीनाथ जवळील इतर प्रेक्षणीय स्थळे ::

ही यात्रा करते वेळी हरिद्वार ऋषीकेशवरून मसुरी, देहराडून आणि व्हॅली ऑफ़ फ़्लॅावर्स हे रम्य ठिकाण पाहता येते. निसर्गत: विविध फुलांनी बहरलेला विस्तीर्ण प्रदेश पहाण्यास विसरू नये. गोविंदद्वार पासून १७ कि.मी. घोड्यावरून आणि पायी प्रवास करून ही फुलाची दरी पाहता येते.